# शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

(महाराष्ट्र शासन स्वामित्व कंपनी)

**CIN : 70200MH1998SGC116664**

५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१.

दुरध्वनी क्र.०२२-०६५९१०८७/२६५९०५८८/२६५९११९८९, फॅक्स क्र. ०२२-२६५९०५८६

**Email ID** : sppl_mumbai@rediffmail.com **Website** : www.sppl.biz


**जा.क्र.** शिपुप्रम/व्य.(प्र)/सा.स.व्य./४७४/२०१७ **दिनांक** : २१ मार्च, २०१७.

**कार्यालयातील साफसफाईचे व्यवस्थापन याकरीता ई-निविदा मागविण्याबाबत.**

खालील नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या कार्यालयातील साफसफाई/स्वच्छतेच्या कामाकरीता इच्छुक सेवा पुरवठादाराकडून सोबतच्या अर्जाच्या नमुन्यात दि. १० एप्रिल, २०१७ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत **ई-निविदा** मागविण्यात येत आहेत.

१. शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या ५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१ येथे असलेल्या कार्यालयाचे एकूण क्षेत्रफळ साधारणपणे ७३०.४९६६ चौरस मीटर इतके आहे.

२. निविदा सोबतच्या विहीत अर्जाच्या नमुन्यात ऑनलाईन Mahatenders या वेबसाईटवर www.mahatenders.gov.in वर दि. १० एप्रिल, २०१७ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करावी. निविदेचा विहित अर्ज ऑनलाईन भरण्यात यावा किंवा स्कॅन करुन लोड करण्यात यावा.

३. प्राप्त निविदा पुढील कार्यालयीन दिवशी म्हणजेच दि. ११ एप्रिल, २०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित ५ वा मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१ येथे उघडण्यात येतील. सदर लिफाफे उघडतेवेळी निविदाधारक स्वत: किंवा त्यांचा एक अधिकृत प्रतिनिधी प्राधिकृत पत्राच्या आधारे-उपस्थित राहू शकतो.

**सर्वसाधारण अटी व शर्ती :**

१) शिपुप्रम कार्यालयातील साफसफाई/स्वच्छता कामात संपूर्ण कार्यालयाची साफसफाई/स्वच्छता, कार्यालय कार्यालयीन वेळेत नेहमीच स्वच्छ ठेवणे. त्याचप्रमाणे कार्यालयामधील टेबल, खुर्च्या, कपाटे, संगणक, प्रिंटर, एअर कंडीशन, झेरॉक्स मशिन, टेलिफोन यंत्रणा इत्यादींची साफसफाई/स्वच्छता कामांचा समावेश आहे.

२) निविदा छाननी शुल्क रु. १,०००/- व बयाना रक्कम रु. ५,०००/- ऑनलाईन भरणा करावी लागेल.

३) निवड होणाऱ्या एजन्सीला सुरक्षा अनामत रक्कम रु. २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शिपुप्रमकडे ठेवावी लागेल.

४) कार्यालयातील साफसफाई/स्वच्छता कामाकरीता कंत्राट कालावधी आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून एक वर्षाकरीता राहील.

५) सदरहु साफसफाई/स्वच्छता कामावर सेवा पुरवठादाराची वैयक्तिक देखरेख राहणे आवश्यक आहे. तसेच शिपुप्रमला आवश्यक त्यावेळी ती सेवा उपलब्ध राहण्याच्या दृष्टीने सेवा पुरवठादाराचे कार्यालय मुंबईतच असणे आवश्यक आहे. मुंबई बाहेर कार्यालय असलेल्या सेवा पुरवठादाराचा साफसफाई/स्वच्छता कामाकरीता विचार केला जाणार नाही.

६) सेवा पुरवठादाराने विहित अर्जात संपूर्ण तपशील न भरल्यास अथवा त्या सोबत अर्जात नमूद केलेल्या कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती जोडलेली नसल्यास तो अर्ज व निविदा रद्द समजण्यात येईल.

क्र.मा.प.

७) सेवा पुरवठादाराची निवड झाल्यावर विहीत करारनामा आठ दिवसाच्या आत करण्यात येईल. त्या करारनाम्यातील सर्व अटी व शर्ती सेवा पुरवठादारावर बंधनकारक राहतील. सेवा पुरवठादारास शिपुप्रम कार्यालयाकडून स्वीकृत करण्यात आलेले दर, पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत अदा करण्यात येईल.

८) पुरविण्यात येणाऱ्या सफाई कर्मचाऱ्याचे वय किमान १८ वर्षे पूर्ण असावे व ६० वर्षापेक्षा जास्त नसावे.

९) साफसफाईकरीता सेवा पुरवठादाराकडून पुरविण्यात येणारे मनुष्यबळ हे अनुभवी असणे आवश्यक आहे तसेच शासनाने विहित केलेल्या ओळखपत्रांपैकी कोणतेही एक ओळखपत्र असणे आवश्यक आहे. उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र इ.

१०) सेवा पुरवठादाराकडून पुरविण्यात येणारा कर्मचारी गुन्हेगारी पार्श्वभूमीचा/ प्रवृत्तीचा नसावा.

११) सदर कर्मचाऱ्यांकरीता कार्यालयीन वेळ सकाळी ९.०० ते सायं. ६.०० वाजेपर्यंत असेल तसेच प्रत्येक रविवारी व महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी साप्ताहिक तसेच शासनाने जाहिर केलेल्या सार्वजनिक सुट्टया असतील. तथापि आगाऊ सुचना दिल्यास सुट्टीच्या दिवशी प्रशासकीय कारणास्तव कार्यालयात आवश्यकतेनुसार कर्मचाऱ्यास उपस्थित राहावे लागेल, याबाबत कोणताही जादा मोबदला देण्यात येणार नाही.

१२) सेवा पुरवठादाराची सेवा समाधानकारक न वाटल्यास एक महिन्याची पुर्व सूचना देऊन करार संपुष्टात आणण्यात येईल, तसेच सेवा पुरवठादाराची सेवा समाधानकारक वाटल्यास पुढील एक वर्षाकरीता कंत्राट वाढविण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक, शिपुप्रम यांना राहतील.

१३) साफसफाई करताना कर्मचाऱ्यास कोणत्याही प्रकारची इजा झाल्यास संबंधित कर्मच्याऱ्यास/कंत्राटदारास वैद्यकीय खर्च अथवा नुकसान भरपाईचे कोणतेही दायित्व शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित कार्यालयाचे असणार नाही.

१४) एकदा ठरविण्यात आलेले दर हे पुढील एक वर्षासाठी राहतील. त्यात कोणताही बदल केला जाणार नाही. सेवा समाधानकारक आढळल्यास ती सेवा त्याच अटी व शर्ती व दरानुसार पुढील एक वर्षाकरीता चालू ठेवण्याचा विचार केला जाईल.

१५) त्याचप्रमाणे सेवा पुरवठादाराकडून पुरविण्यात येणारी सेवा समाधानकारक न वाटल्यास एक महिन्याची पूर्वसूचना देऊन करण्यात आलेला करार संपुष्टात आणण्याचे अधिकार कंपनीने राखून ठेवले आहेत.

१६) एखाद्या दिवशी नेहमीचा कर्मचारी उपलब्ध न झाल्यास दुसरा कर्मचारी त्वरीत उपलब्ध करुन देणे हे सेवा पुरवठादारावर बंधनकारक राहील, अन्यथा त्या दिवसाची अनुपस्थिती धरण्यात येईल. अनुपस्थितीच्या दिवसाची रक्कम सेवा पुरवठादाराच्या मासिक देय रक्कमेतून वसूल करण्यात येईल.

१७) वरील अटी व शर्तीचे योग्य प्रकारे पालन करणे सेवा पुरवठादारावर बंधनकारक राहील. अन्यथा दंडात्मक किंवा इतर कार्यवाही करण्याचा अधिकार कंपनीकडे असेल.

१८) या निविदे प्रकरणी मा. व्यवस्थापकीय संचालक/शिपुप्रम यांचा निर्णय अंतिम राहील तसेच तो सर्वांना बंधनकाराक राहील.

१९) कोणतीही निविदा अथवा संपूर्ण निविदा प्रक्रिया, कोणतेही कारण न देता, रद्द करण्याचे अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक/शिपुप्रम यांच्याकडे ठेवण्यात आलेले आहेत.

**ठिकाण** : वांद्रे (पू), मुंबई.
**दिनांक** : २१ मार्च, २०१७.

व्यवस्थापक (प्रशा)
शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

# शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

(महाराष्ट्र शासनाच्या संपूर्ण मालकीचीकंपनी)
**CIN No. : 70200MH1998SGC116664**
५ वा माळा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१
**दुरध्वनी क्र.** २६५९०५८८/ २६५९१०८७/ २६५९११८९ **फॅक्स:** २६५९०५८६
**ई-मेल :** sppl_mumbai@rediffmail.com **वेबसाईट:** www.sppl.biz

## शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या कार्यालयातील साफसफाई/स्वच्छता कामाची ई-निविदाकरीता विहित अर्जाचा नमुना.

१. निविदा सादरकरणाऱ्या सेवा पुरवठादाराचे
नाव व संपूर्ण पत्ता :

२. दुरध्वनी क्रमांक :
फॅक्स क्रमांक :
ई-मेल :

३. पॅनकार्ड नोंदणी क्र. :
(फोटो प्रत स्व-स्वाक्षांकित जोडणे आवश्यक)

४. व्हॅट नोंदणी विषयक तपशील :
प्रमाणपत्र देणारे कार्यालय :
प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक :
वैधतेची मुदत :
(प्रत स्व-स्वाक्षांकित जोडणे आवश्यक)

५. सेवाकर नोंदणी विषयक तपशील :
प्रमाणपत्र देणारे कार्यालय :
प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक :
(प्रत स्व-स्वाक्षांकित जोडणे आवश्यक)
वैधतेची मुदत :

७. अनुभव(स्व-स्वाक्षांकित प्रत जोडणे आवश्यक) : एकूण वर्षे :

८. मी /आम्ही वित्तीय निविदा खालीलप्रमाणे सादर करीत आहे/आहोत.

| | |
|---|---|
| **सेवा पुरवठादाराकडून साफसफाई/स्वच्छता कामासाठी दरमहा निविदा रक्कम**<br>[पुरविण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या(कमीत कमी दोन असावी)<br>कर्मचाऱ्याचे दरमहा वेतन कामगार आयुक्त कार्यालयाच्या आदेशानुसार निश्चित केलेल्या किमान वेतनापेक्षा कमी नसावे. त्यानुसार तपशील खालीलप्रमाणे<br>अ) पुरविण्यात येणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची संख्या : पुरुष____स्त्री______<br>प्रत्येकी वेतनाची रक्कम : पुरुष________स्त्री________<br>ब) यंत्राने साफसफाई करण्यात येणार असल्यास कर्मचाऱ्यांची संख्या : पुरुष____स्त्री___<br>प्रत्येकी वेतनाची रक्कम : पुरुष_________स्त्री__________] | एकुण रु.----------.<br>(अक्षरी रु.---------<br>-------------------<br>-------------------<br>-------------------) |

**दिनांक :** / /२०१७.

**स्थळ :** मुंबई.

**(शिक्यासहित स्वाक्षरी)**

**सोबत :** १) ४)
२) ५)
३)

**<u>सूचना :</u>** दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, ओव्हररायटींग (गिरवणे), पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास निविदा रद्द समजण्यात येईल.